**प्रेस नोट  दिनांकः- २३/०७/२०१९**
**चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शहर**

## मोबाईल / सीमकार्ड विक्रेते यांची सुरक्षिततेच्या दृष्टीने मिटींग घेतलेबाबत

दिनांक २३/०७/२०१९ रोजी १६/३० ते १७/३० वा दरम्यान वपोनि. कृष्णा इंदलकर, चंदननगर पो.स्टे. यांनी स्वतः पोलीस स्टेशन कडील कर्मचारी पोहवा हरी कदम, पोलीस नाईक श्रीकांत कुरकेल्ली यांनी हद्यीतील मोबाईल / सीमकार्ड खरेदी विक्री करणारे चालक/मालक यांची बैठक घेऊन मिटींगमध्ये मोबाईल चालक/मालक यांना पुणे शहरात होणा-या मेबाईल चो-या रोखण्यासाठी व गुन्हयांना रोखणे अनुषंगाने घ्यावयाचे दक्षतेबाबत, सुरक्षीततेसंबधाने यासंबधाने चर्चा करुन मार्गदर्शन केले त्यांना असलेल्या अडीअडचणीबाबत विचारणा करुन त्यांचे शंका व अडचणीचे निरसन केले. सदर मिटींग दरम्यान त्यांना पोलीस आयुक्तालयामध्ये स्थापन केलेल्या पोलीस काका, भरोसा सेलच्या योजनेची माहीती देवुन, योजनेचा उपयोग करुन घेणेसाठी मार्गदर्शन केले. अडचणींचे दरम्यान चंदननगर पोलीस स्टेशन फोन नं. ०२०/२७०१२३२१ किंवा पोलीस कंन्ट्रोल रूम नं. १०० वर संपर्क सांधुन मदत मागणेसाठी माहिती दिली. सदर ठिकाणी २० मोबाईल चालक हजर होते.

सदरची चांगली कामगीरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक – कृष्णा इंदलकर, पोहवा हरी कदम, पोलीस नाईक श्रीकांत कुरकेल्ली यांनी केलेली आहे. सदर मिटींगचे घेण्यात आलेले फोटो खालीलप्रमाणे:-

